# महाराष्ट्र विधानसभा

**पहिले अधिवेशन, २०२५**

**सन २०२५-२६ च्या अर्थसंकल्पीय मागण्या**

**माननीय अध्यक्षांनी मान्य केलेल्या कपात सूचनांची यादी**

**बुधवार, दिनांक १९ मार्च, २०२५**

**सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग**

**कपात सूचनांची एकूण संख्या - २**

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **मागणी क्रमांक: व्ही-२**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २४२५, सहकार**<br>**रूपये:- १५,०६,९१,९७,०००/-**<br>**श्री. विजय वडेट्टीवार** |
| (१) | ५९० | १० | शिक्षक सहकारी बँक कमाल चौक नागपूर या बँकेत गोल्डलोनसाठी आलेल्या दागिन्याची कोणतीही शहानिशा न करता बँक कर्मचाऱ्याने अधिकाऱ्यासोबत संगनमत करून बनावट दागिने खरे असल्याचे दाखवून गोल्डलोन च्या माध्यमातून जवळपास ७५ लाख रुपयांची फसवणूक करणे, ग्राहकांच्या दागिन्यांची सत्यत्ता तपासण्याचे काम ज्या कर्मचाऱ्याकडे होते त्या कर्मचाऱ्यांनी बँक अधिकाऱ्यासोबत संगनमत करून जवळपास १६ ग्राहकांच्या वर गोल्डलोन मंजूर करणे, या गोल्डलोन च्या माध्यमातून बँकेची लाखो रुपयांनी फसवणूक करण्यात आलेली असताना सुद्धा सहकार विभागाने कोणतीही चौकशी केलेली नसल्याने बँक ग्राहकात पसरत असलेले तीव्र असंतोष व संतापाचे वातावरण परिणामी या गंभीर प्रकरणी सहकार विभागाकडून संबंधित अधिकारी, बँकेचे संचालक यांच्यावर तातडीने कारवाई करण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **मागणी क्रमांक: व्ही-३**<br>**मुख्य लेखाशीर्ष: ४४२५, सहकारावरील भांडवली खर्च**<br>**रूपये:- १,०००/-**<br>**डॉ. बाबासाहेब देशमुख** |
| (२) | ५४८ | १० | राज्यात वस्त्रोद्योग व्यवसायात कापसाचे वाढलेले भाव व सुताच्या बाजारातील घसरलेल्या किंमती इत्यादींमुळे वस्त्रोद्योग व्यवसायात अनेक अडचणी निर्माण झालेल्या आहेत. या अनुषंगाने महाराष्ट्रातील सहकारी सुत गिरण्यांच्या अडचणी सोडविण्याबाबत राज्य शासनाच्या सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग यांचेकडील शासन निर्णय क्र. बैठक -१५२१/प्र.क्र.२३/टेक्स १ (अ) दि.१७.११.२०२३ नुसार सहकारी सुतगिरण्या सुरळीत चालाव्यात तसेच आर्थिक अडचणीतून बाहेर याव्यात यासाठी दि.१७.१.२०१७ रोजीच्या लागू केलेल्या योजनेच्या धर्तीवर शेतकरी महिला सहकारी वस्त्रनिर्माण सूत गिरणी मर्या सांगोले यांना सदर कर्जाची उचल |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | घेण्यास विलंब झाल्याने शासनाकडून देण्यात येणाऱ्या योजनेच्या लाभापासून सदर संस्था वंचित राहणार आहे. तरी शेतकरी महिला सहकारी वस्त्रनिर्माण सूत गिरणी मर्या सांगोले यांना प्रती चाती रु.५००० प्रमाणे कर्जावरील व्याज प्रदान योजनेस तात्काळ मुदतवाढ देण्यात येवून सदर सुतगिरण्यांचे पुनर्जिवित करण्यात येणेबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

**विधान भवन**
**मुंबई,**
**दिनांक : १८ मार्च, २०२५**

**( जितेंद्र भोळे ),**
**सचिव-१ (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा**

**याची प्रत :**

(१) मंत्री व राज्यमंत्री
(२) विधानसभेचे सर्व सदस्य.
(३) सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग
(४) संसदीय कार्य विभाग.
(५) वित्त विभाग.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई